ePaper

# अखेर महायुतीचा मंत्रिमंडळ विस्ताराचा फॉर्म्युला ठरला; सूत्रांची माहिती

॥ वर्ष - 8 । अंक -155 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 13 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- रोहित शर्मा यशस्वीवर वैतागला!
- नितीश राणा युवा खेळाडूवर संतापला
- ‘मी तेव्हा माझे तोंड लपवतो’
- आता दिल्ली विधानसभेची धूम!



## भारताच्या बुद्धिबळपटूने घडवला इतिहास!

# डी गुकेश विश्वविजेता!

### जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत जगज्जेता डिंग लिरेनचा पराभव; इतिहास घडवला

**। नवी दिल्ली । महाईन्यूज**

**भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेश विश्वविजेता ठरला आहे. दोम्माराजू गुकेश ने १८व्या वर्षी विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला. १८वर्षीय गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत जगज्जेता डिंग लिरेनचं आव्हान मोडून काढत इतिहास घडवला.**

आतापर्यंतच्या १३ डावांपैकी ३२वर्षीय लिरेनने पहिला डाव जिंकला होता. त्यानंतर गुकेशने तिसरा डाव जिंकून बरोबरी साधली. त्यानंतर दोन्ही ग्रँडमास्टर्सनी सलग सात डाव बरोबरीत सोडवले होते. ११व्या डावात गुकेशने विजय मिळवून बरोबरीची कोंडी सोडवली. १२व्या डावात लिरेनने बाजी मारली. अखेरचा डाव कोण जिंकणार की हा मुकाबला टायब्रेकरमध्ये जाणार याकडे बुद्धिबळ चाहत्यांचं लक्ष होतं. गुकेशने दमदार खेळ करत विश्वविजेता होण्याचा मान पटकावला. सगळ्यात लहान वयाचा विश्वविजेता होण्याचा विक्रम आता गुकेशच्या नावावर नोंदला गेला आहे. लिरेनच्या हातून झालेल्या घोडचुकीनंतर गुकेश विश्वविजेता होणार असल्याचं स्पष्ट झालं आणि त्याच्या डोळ्यात विजयाश्रू तरळले.

गुरूवार, १२ डिसेंबर रोजी सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप सामन्याच्या १४व्या निर्णायक सामन्यात डिंग लिरेनचा पराभव करून सर्वात गुकेश विश्वविजेता ठरला. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर विश्वविजेता ठरणार दुसरा भारतीय ठरला.

गुकेश आणि डिंग यांनी गुरुवारी सामन्याच्या अंतिम डावात प्रत्येकी ६.५ गुणांसह बरोबरी साधली. १४व्या डावात, ज्यात डिंग पांढऱ्या सोंगट्यासह खेळत होता, तो सामन्याच्या ५३व्या चालीत डिंगने चूक होईपर्यंत अनिर्णित दिशेने वाटचाल केली होती. गुकेशने खेळत राहत डिंगवर दबाव आणणं सुरू ठेवलं आणि यात गतवर्षीचा विश्वविजेता लिरेन फसला.



### मी माझं स्वप्न जगतो आहे, देवाचे आभार...

लिरेन आणि गुकेश यांच्यातील अंतिम डावातील सामना ही ड्रॉ होण्याच्या मार्गावर होता पण डिंगच्या हातून मोठी घोडचूक घडली आणि त्याच्या हातातून सामना निसटला.

### प्रशिक्षकांचा पाठिंबा मिळाला...

डी. गुकेश त्याच्या सपोर्ट स्टाफचे आभार व्यक्त करताना पुढे म्हणाला, “गायो (ग्रेजेगोर्ज जेवस्की) गेल्या दोन वर्षांपासून माझे ट्रेनर होते. पॅडी उपटन माझ्या टीमचा भाग नसले तरी जागतिक बुद्धिबळ स्पर्धेसाठी सराव करताना त्यांचा खूप मोठा पाठिंबा मिळाला. RADOSŁAW WOJTASZEK इथे आहेत. पेंटाला हरिकृष्णही आहेत. व्हिन्सेंट कीमर, जॅन-क्रिझिस्टोफ डुडा आणि जॅन क्लिमकोव्स्की हे माझ्या टीममधील इतर मंडळी आहेत.“ पॅडी उपटन हे मेंटल हेल्थ कोच आहेत. ते दक्षिण आफ्रिका संघाचे क्रिकेट प्रशिक्षक राहिले आहेत. याबरोबर ते आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स संघाचे २०१५-२०१५ आणि २०१९-२०२० दरम्यान कोच होते. तर दिल्ली कॅपिटन्स संघाचे २०१६ मध्ये प्रशिक्षक होते.

## ‘वन नेशन वन इलेक्शन’ विधेयकाला मंजुरी!

### मोठा निर्णय: उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

एकाचवेळी निवडणुका घेण्याबाबत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या. त्यानंतर जवळपास ३ महिन्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी दोन विधेयकांना मंजुरी दिली. त्यात



एक घटना दुरुस्ती विधेयक आहे. यामध्ये एक विधेयक लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचे आहे तर दुसरे एक सामान्य विधेयक आहे. हे विधेयक दिल्ली, पुद्दुचेरी आणि जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासंबंधी आहे. हे विधेयक येत्या सोमवारी किंवा पुढील आठवड्यात कोणत्याही दिवशी सभागृहात आणले जाऊ शकते.

सदर विधेयक लोकसभेत मांडले जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. हे प्रास्ताविक स्वरूपात असेल आणि सविस्तर चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले जाईल. स्थानिक निवडणुका (पंचायत आणि नगरपालिका) नंतरच्या टप्प्यासाठी सोडून राष्ट्रीय (लोकसभा) आणि राज्य (विधानसभा) निवडणुका एकाच वेळी घेण्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

### लोकसभा, राज्यसभा आता एकाचवेळी

समितीने १८,६२६ पृष्ठांचा अहवाल सादर केला होता. समितीने लोकसभेच्या आणि राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांसह पंचायत आणि नगरपालिकांच्या एकाचवेळी निवडणुका घेण्यास सक्षम करण्यासाठी कलम 324A लागू करण्याची शिफारस केली होती. तसेच लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घ्याव्यात. तसेच 100 दिवस पूर्ण झाल्यानंतर नगरपालिका आणि पंचायतीच्या निवडणुका घ्याव्यात, अशी सूचना या अहवालात करण्यात आली होती. एकाचवेळी निवडणुका घेतल्याने संसाधने वाचतील, विकासाला चालना मिळेल, सामाजिक ऐक्य वाढीस लागेल.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचा तोंडी आदेश!

## अंमलबजावणी कधी होणार: एमपीएससीचे विद्यार्थी संभ्रमात

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ आणि अराजपत्रित गट ब आणि क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यासाठी संधी द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली होती. दरम्यान मुख्यमंत्र्यांकडून मुख्य सचिवांना तोंडी आदेश देण्यात आले आहेत.**




परंतु अंमलबजावणी झाली नसल्यामुळे एमपीएससीचे विद्यार्थी संभ्रमात आहेत. त्यामुळे पत्रकार परिषद घेउन वयामध्ये शिथिल देण्याची मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणारी संयुक्त अराजपत्रित गट ब आणि गट क पूर्व परीक्षेची वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकातील गट ब पदासाठी जाहिरात ही जानेवारी 2024 मध्ये ठरलेले होती. परंतु आयोगाच्या काही तांत्रिक कारणामुळे ही जाहिरात एक वर्ष उशिरा प्रकाशित झाली आहे. त्यामुळे 2024 मध्ये वयोमर्यादा बसणारे लोकसेवा आयोगाची परीक्षा देणारे हजारो विद्यार्थी या वयामध्ये बसत नाहीत, त्यामुळे ही जाहिरात वेळीच दिलेल्या वेळापत्रकानुसार आली असती, तर सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नसते. पाच जानेवारी रोजी होणाऱ्या परिक्षेआधी वयोमर्यादामध्ये बदल करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. या विद्यार्थ्यांची संधी केवळ प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हिरावून घेतली जाणार आहे. त्यामुळे आपले अपूर्ण स्वप्न घेऊन पुन्हा घरी कसे जावे, असा प्रश्न या विद्यार्थ्यांना पडला आहे. आयोगातर्फे खुल्या प्रवर्गासाठी ३१, मागास प्रवर्गासाठी ३४ तर खेळाडूसाठी ३६ वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. परंतु पीएसआय पदासाठी वय मोजताना १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मोजले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची संधी हुकणार आहे.

> सरकार आमच्यासोबत खूप खेळ करत आहे. तरुणांचे भवितव्य त्यांच्या हातात आहे. ते फक्त आपलीच सोय पाहतात. कोरोनामुळे आम्ही बरेच काही गमावले आणि आताही नवीन जाहिरात प्रक्रिया आम्हाला अडचणीत घालत आहे. आम्ही काय गुन्हेगार आहोत का? सरकारने आमच्या या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावी.
>
> **-प्रवीण पाटील,** विद्यार्थी

> आमची समस्या लवकरच सोडवली पाहिजे. अनेक तरुणाचे भवितव्य यावर अवलंबून आहे. आम्ही सर्वजण एकत्र येऊन सरकारवर दबाव टाकू शकतो. मला विश्वास आहे की शेवटी न्याय मिळेल.
>
> **-भाऊसाहेब पाटणकर,** विद्यार्थी.

त्यामुळे वयोमर्यादा मोजताना १ एप्रिल, २०२४ मोजली जावी, असे विद्यार्थ्यांची मागणी आहे. पत्रकार परिषद घेउन वयामध्ये शिथिल देण्याची मागणी करण्यात आली आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येणारी संयुक्त अराजपत्रित गट ब आणि गट क पूर्व परीक्षेची वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकातील गट ब पदासाठी जाहिरात ही जानेवारी 2024 मध्ये ठरलेले होती. परंतु आयोगाच्या काही तांत्रिक कारणामुळे ही जाहिरात एक वर्ष उशिरा प्रकाशित झाली आहे. त्यामुळे 2024 मध्ये वयोमर्यादा बसणारे लोकसेवा आयोगाची परीक्षा देणारे हजारो विद्यार्थी या वयामध्ये बसत नाहीत, त्यामुळे ही जाहिरात वेळीच दिलेल्या वेळापत्रकानुसार आली असती, तर सर्व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नसते. पाच जानेवारी रोजी होणाऱ्या परिक्षेआधी वयोमर्यादामध्ये बदल करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

# नाट्यगृहांमध्ये आता मराठी चित्रपटांचे प्रदर्शन

## सांस्कृतिक विश्व : मागणीला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महापालिकेच्या अखत्यारितील नाट्यगृहांमध्ये आता मराठी चित्रपटाचे प्रदर्शन होणार आहे. यासंदर्भात कलाकारांनी केलेल्या मागणीला महापालिका प्रशासनाने गुरुवारी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**



नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपट दाखविण्यात यावा, या विषयावर कलाकार आणि महापालिका सांस्कृतिक विभागातील अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये कोणत्या नाट्यगृहांमध्ये चित्रपट दाखवता येऊ शकतात आणि त्यासाठीच्या यंत्रणा उभारणीवर चर्चा करण्यात आली. त्याला महापालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त सुनील बल्लाळ यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, अभिनेत्री गार्गी फुले, अभिनेते विजय पटवर्धन, ऑल आर्टिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष योगेश सुपेकर, निर्माते कौस्तुभ कुलकर्णी, मच्छिंद्र धुमाळ, निर्माते उपेंद्र कुलकर्णी आणि नाट्यगृहांचे मुख्य व्यवस्थापक राजेश कामठे या बैठकीला उपस्थित होते.

> हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमुळे मराठी चित्रपटांना खेळ मिळत नाहीत. त्यामुळे मराठी चित्रपट निर्मात्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्याला पर्याय म्हणून नाट्यगृहांमध्ये मराठी चित्रपट दाखवावेत, या मागणीकडे महापालिका सांस्कृतिक विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत असून त्याला गुरुवारी सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.
>
> **- बाबासाहेब पाटील,**
> प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस सांस्कृतिक विभाग.

# व्यावसायिक गॅसचा काळाबाजार उघड; पोलिसांकडून सिलिंडरच्या ७२ टाक्या जप्त, एकाला अटक

। पुणे ।महाईन्यूज ।

व्यावसायिक गॅसचा काळाबाजार पुन्हा एकदा समोर आला असून, सिंहगड रस्ता पोलिसांनी छापा टाकून गॅस सिलिंडरच्या तब्बल ७२ टाक्या पकडल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांनी एकाला अटक केली असून, त्याच्याकडे कसून चौकशी केली जाvत आहे. पोलिसांनी टेम्पो तसेच गॅस टाक्या असा दहा लाखांचा ऐवज जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी सोमनाथ लहू भोजने (वय ३१, रा. वडगाव बुद्रुक, मूळ. तुळजापूर) याला अटक केली आहे. तर, टाक्या विक्री करण्यास देणाऱ्या विकाश धोंडाप्पा आकळे (रा. वडगाव बुद्रुक) याच्यावर गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८७, २८८, ३ (५) सह जीवनावश्यक वस्तुचा कायदा १९५५ चे कलम ३, ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक परिमंडळ तीनचे उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक दिलीप दाईगंडे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, देवा चव्हाण यांच्या पथकाने केली.

शहरात व्यावसायिक तसेच घरघुती गॅसचा काळाबाजार सातत्याने होत असल्याचे दिसत आहे. घरघुती गॅसमधून व्यावसायिकांना अवैधरित्या तो इतर टाक्यांमध्ये टाकून गॅस विकला जात आहे. दरम्यान, सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यातील तपास पथकाचे उपनिरीक्षक संतोष भांडवलकर आणि त्यांचे पथक हद्दीत गस्त घालत होते. तेव्हा त्यांना माहिती मिळाली की, वडगाव भाजी मंडई येथून गोयल गंगाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सिलबंद व्यावसायिक गॅस सिलिंडरची अवैधरित्या विक्री होत आहे. त्यानुसार, भांडवलकर आणि पथकाने येथे धाव घेतली आणि सापळा रचून सोमनाथ याला ताब्यात घेतले.

## सुरक्षा यंत्रणांना आव्हान

# पिंपरीत वास्तव्य, पासपोर्ट गोव्यातून!

### बनावट कागदपत्रांच्या आधारे शहरात 20 बांगलादेशींचे वास्तव्य

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गोव्यातील पारपत्र कार्यालयातून बनावट कागदपत्रांद्वारे पारपत्र (पासपोर्ट) काढून पिंपरी-चिंचवड शहरात २० बांगलादेशी नागरिकांनी वास्तव्य केल्याचे उघडकीस आले आहे. त्यांची पारपत्रे गोव्यातील पारपत्र कार्यालयातून रद्द करण्यात आली आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात राहत असल्याची कागदपत्रे सादर करून आतापर्यंत ६४ बांगलादेशी नागरिकांनी पारपत्र काढल्याचे पोलीस तपासात निदर्शनास आले आहे.**




सहायक पोलीस निरीक्षक अंबरिश देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२४ मध्ये निगडीतील साईनाथनगर परिसरातून चार बांगलादेशी नागरिकांना अटक केली होती. त्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे आधारकार्ड, पॅनकार्ड काढले होते. या आरोपींची टोळी असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी गोव्यातून पारपत्र काढले होते. १९ जणांनी सांगवीचा, तर एकाने पुण्यातील दत्तवाडी येथील पत्ता दिला होता. आरोपींचे पारपत्र पडताळणीसाठी सांगवी पोलिसांकडे आले होते.

आरोपी बांगलादेशी असून, त्यांनी बनावट कागदपत्रे दिली आहेत. त्यामुळे या सर्वांचे पारपत्र रद्द करण्यात यावे, असे पत्र निगडी पोलिसांनी गोवा पारपत्र कार्यालयास जुलै २०२४ मध्ये दिले. त्यानुसार गोवा पारपत्र विभागाने या बांगलादेशी घुसखोरांचे पारपत्र रद्द केल्याचे पत्र निगडी पोलिसांना दोन दिवसांपूर्वी पाठविले आहे.

#### करारनाम्याच्या आधारे पारपत्र

बांगलादेशी नागरिक शहरात आल्यावर खोली भाड्याने घेत करारनामा करीत होते. त्या भाडे करारनाम्याच्या आधारे बँकेत खाते सुरू करत होते. बँकेतील खात्याचे पासबुक वापरून आधार कार्डवरील पत्त्यात बदल करीत होते. त्यानंतर बदललेल्या पत्त्यावरून पारपत्रासाठी अर्ज करत असल्याचे पोलीस चौकशीत निदर्शनास आले आहे. २० बांगलादेशी नागरिकांचे पारपत्र रद्द केल्याचे गोवा कार्यालयाचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यांपैकी चार जण जामिनावर बाहेर आहेत. १६ जण कोठे आहेत, याची माहिती घेण्यात येत असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक अंबरिश देशमुख यांनी सांगितले.

#### गोव्यातून पारपत्र का काढत होते?

गोव्यामध्ये परदेशी नागरिकांचा सतत राबता असतो. त्यामुळे गोवा कार्यालयातून पारपत्र मिळाल्यावर व्हिसा मिळविण्यात अडचणी येत नाहीत. त्यामुळे बांगलादेशी घुसखोर हे गोव्यातून पिंपरी-चिंचवडच्या पत्त्यावर पारपत्र काढत होते. आतापर्यंत शहरातून ६४ बांगलादेशी नागरिकांनी पारपत्र काढल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे.

---

## भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ‘किसान’

### 500 हून अधिक कंपन्यांचा सहभाग: मोशी येथे 15 डिसेंबरपर्यंत आयोजन

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**‘किसान’ या भारतातील सर्वात मोठ्या कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले. दिनांक ११ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, पुणे येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.**

१५ एकर पसरलेल्या प्रदर्शनात ५०० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था व नवउद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनाच्या ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ उद्योगातील कंपन्यांचे स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत आयोजित केले आहे.

**पूर्वनोंदणी :** प्रदर्शनाच्या प्रवेशव्दारावर मोबाईल ॲपद्वारे आगाऊ नावनोंदणीची सोय केली आहे. ३०,००० हुन अधिक शेतकऱ्यांनी पूर्वनोंदणी केली असून ही संख्या १००,००० ओलांडण्याची अपेक्षा आहे.

#### किसान आता मोबाईलवरसुद्धा...

प्रत्यक्ष प्रदर्शनातील सहभागासोबतच प्रदर्शक कंपन्या किसान ॲपवर त्यांच्या उत्पादनांची डिजिटल यादी देखील प्रसिद्ध करू शकतात. शेतकरी घरबसल्या विविध उत्पादनांविषयी माहिती मिळवू शकतात आणि त्यांच्या मोबाईलवर संबंधित व्हिडिओ पाहू शकतात. प्रदर्शक आणि अभ्यागत

#### मातीच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम

या वर्षी किसानमध्ये मातीमोल हा मातीच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम साजरा केला जात आहे. आपली माती जिवंत आहे की नाही? यावर चर्चा सुरू करणे, मातीच्या आरोग्याविषयी शेतकरी समुदायामध्ये जागरूकता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. चला आपल्या मातीची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊया, अर्थात मातीमोल जाणूया. हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरेखित विभागांसोबत संयुक्तपणे आयोजित करण्यात येत आहे.



## भूमिका

# क्रिडा व संस्कृतीचा महासंगम

**नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात २०१६ पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरमध्ये खासदार महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जातो.त्याचप्रमाणे याही वर्षी दिनांक १३ डिसेंबर २०२४ पासून खासदार महोत्सवाला सुरुवात होत आहे व विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून देशाच्या संस्कृतीचे दर्शन दिनांक २२ डिसेंबरपर्यंत सर्वांनाच पहायला मिळेल.**




नितीनजी गडकरी यांनी नागरिकांसाठी आयोजित केलेले आहेत याकरिता त्यांचें मनापासून स्वागतच. याकार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यात मुख्यत्वे करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या माध्यमातून, गाण्यांच्या माध्यमातून व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवीला जातो.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.सध्या सुरू असलेल्या खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आपल्याला महाराष्ट्राचा वारसा दिसून येईल.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे.पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने याहीवर्षीही आपल्याला खासदार महोत्सव पहायला मिळत आहे. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे. परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पुत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. भाजपा सत्तेत असो वा नसो नितीन गडकरी यांनी नागपूरमध्ये अनेक सांस्कृतिक कार्यक्रम,कला, साहित्य, क्रिडा,सामाजिक उपक्रमांमध्ये खंबीरपणे भूमिका बजावुन आपले योगदान देत असतात.आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुलांचा बोलबाला दिसून येतो.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय. आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.आजच्या पिढीला मोबाईलमुळे व सोशल मीडियामुळे आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येत आहे. परंतु नवीन पिढीला सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती किंवा देशाची संस्कृतीचे जतन कसे करावे याची माहिती अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून मिळते. खासदार महोत्सवाच्या अनुषंगाने आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.१९४७ नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे. कारण खरोखरच महाराष्ट्राचा व देशाच्या विकास मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा हा काळ असल्याचे दिसून येते.ज्या दिवसापासुन गडकरीजी खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे म्हणूनच त्यांना विकासपुरुष म्हणून ओळखल्या जाते.ही नागपूरकरांसाठी,महाराष्ट्रासाठी व देशासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली विकासासोबतच सांस्कृतीची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते. यासाठी त्यांनी आपली ताकद पुर्णपणाला लावली आहे. भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.

## प्रासंगिक »

### आर्थिक वादळे!

***समाजाच्या आर्थिक जीवनात बरेच वेळा प्रचंड मोठ्या घटना घडतात व त्यांचे दुष्परिणाम दूर करणे किंवा नियंत्रित करणे याकरिता समाजाला बरेच काही नव्याने शिकावे लागते.***

आता जागतिकीकरणामुळे या घटना एखाद्या देशापुरत्या मर्यादित राहात नाहीत. त्या जागतिक स्वरूप धारण करतात आणि मग प्रत्येक देशाला व तेथील जनतेला त्यांच्या विशिष्ट परिस्थितीप्रमाणे त्याचे चटके सहन करावे लागतात. त्यातही उच्च उत्पन्नाच्या वर्गाचे लोक असे परिणाम सहजतेने पेलतात, मध्यम वर्गाचे लोक कसेतरी पेलतात आणि त्याचा सर्वाधिक फटका हा अल्प उत्पन्नाच्या लोकांना सोसावा लागतो. अशी संकटे कधीतरी एकेकटी आली तर त्यातून निभावून नेणे हे तुलनेने सोपे जाते; परंतु ही सगळी संकटे एकाचवेळी आली तर त्यांचे भयावह दुष्परिणाम समाजाला किंवा देशाला सोसणे क्रमप्राप्त ठरते. त्यामधून सावरण्यासाठी त्या देशांची सरकारे, आंतरराष्ट्रीय संस्था आणि समाजातील लोक हे दुष्परिणाम किती कमी करू शकतात.

आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. शाळेत रोजच्या प्रतिज्ञेच्या निमित्ताने याचे स्मरण रोज करून दिले जात असे. या विविधतेची प्रशंसा जरी प्रत्येकाच्या मुखी असली तरी याचे भान फारच कमी व्यक्तींना असते. एखादी गोष्ट रोज म्हटल्याने ती फारतर आपल्या मेंदूच्या कोणत्यातरी कोपऱ्यात जाऊन बसत असेल.

# खरोखरच 'विविधतेत एकता' आहे का?

भारतातील याच वैविध्यामुळे हे एक राष्ट्र असू शकत नाही, असा समज इंग्रजांनी भारतीयांच्या मनात पेरला होता. भारताला चिरकाळ गुलामीत ठेवणे हा त्यामागचा हेतू होता. यातून जगाला एकाच चष्म्यातून पाहण्याची त्यांची मानसिकता प्रतिबिंबित झाली. समाज हा काही विज्ञानाच्या नियमांप्रमाणे चालत नाही. एकादा समाज अमुक प्रकारचा असेल, त्या समाजातील लोक अमुक गोष्टींना प्राधान्य देत असतील तर जगातील कुठलाही समाज हीच लक्षणे दाखवेल हा समजच मुळात मूर्खपणाचा आहे. भारतीय समाज समजू न शकल्यामुळेच इंग्रज ज्याप्रमाणे आफ्रिकेच्या आणि ऑस्ट्रेलियाच्या मूळ संस्कृतीचे उच्चाटन करू शकले तसे ते भारतीय संस्कृतीचे करू शकले नाहीत. भारताच्या विविधतेविषयी बोलताना नेहेमीच 'विविधतेत एकता' हा विचार अधोरेखित केला जातो. पंतप्रधानांपासून सामान्य व्यक्तींपर्यंत सर्वचजण हा विचार अगदी डोक्यावर घेऊन मिरवतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर ही



या विविधतेतील एकतेविषयी कुतूहल दिसते. पण आपण खरोखरच एक आहोत का, याचा विचार फारसा होताना दिसत नाही. एकमेकांपासून पूर्णपणे भिन्न असलेल्या व्यक्ती जेव्हा एकत्र येऊन सालोख्याने समाजात राहतात तेव्हा त्याला विविधतेत एकता म्हणता येऊ शकते. कोणालाही प्रथम दर्शनी भारतीय समाज या धाटणीचा आहे, असेच वाटेल. परंतु भारतीय समाजाची विविधतेची व्याख्या वास्तवाच्या कसोटीवर घासून पाहिली असता आपण एका वेगळ्या निष्कर्षापर्यंत पोहोचतो. भारतीय समाजात काळाच्या विविध टप्प्यांवर विविध पंथ उदयास आले. अनेक भाषा निर्माण झाल्या. वेगवेगळ्या भूभागामध्ये वेगवेगळ्या संस्कृतींचा जन्म झाला. अनेक साम्राज्ये उदयास आली आणि लोप पावली. अनेक आक्रमणे झाली. या साऱ्याचे भारताच्या सामाजिक विविधतेत मोलाचे योगदान आहे. विविध प्रांतांत फिरताना मला कधीच हे लोक आपल्यापेक्षा वेगळे आहेत, असे जाणवत नाही. त्यांची भाषा कळत नसली, त्यांचे राहणीमान वेगळे असेल तरी हे लोक आपल्याच सारखे आहेत, ही भावना असतेच. याचा अर्थ पोशाख, भाषा, संस्कृती, राहणीमान इत्यादींत असलेली विविधता ही भारतीय समाजाचा दुय्यम घटक आहे तर समाजामध्ये असलेली भारतीयत्वाची भावना आ समाजाचा मुख्य घटक आहे. 'विविधतेत एकता' हे दोन शब्द ऐकताच लाकडांची मोळी डोळ्यांसमोर येते. त्या मोळीतील प्रत्येक लाकूड वेगळे असते आणि ती मोळी एका दोरीच्या सहाय्याने बांधलेली असते. दोरी तुटली की त्या मोळीची एकता नष्ट होते आणि सर्व लाकडे वेगळी होतात. भारतीय समाजदेखील असाच 'विविधतेत एक' आहे असा समज इंग्रजांचा होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयमधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गृहखाते नक्की कुणाकडे येणार?

## फडणवीस-पवार दिल्लीत असताना शिंदे का नाहीत?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात सध्या मंत्रीमंडळ विस्ताराची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. आधी एकनाथ शिंदेंनी अगदी शपथविधीच्या दोन तास आधी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घ्यायला तयार असल्याचं मान्य केलं. त्यानंतर आता दिल्लीत देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार एकाच वेळी उपस्थित असताना एकनाथ शिंदे मात्र महाराष्ट्रातच आहेत. अजित पवारांनी शरद पवारांची तर देवेंद्र फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह पक्षाच्या प्रमुख नेत्यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण येऊ लागलं आहे. या सर्व चर्चांवर खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.**



देवेंद्र फडणवीसांनी राजधानी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाच्या प्रमुख नेत्यांशी झालेल्या भेटीचा तपशील सांगितला. "एक पद्धत आहे की जेव्हा आपण मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतो, त्यानंतर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती यांची भेट घ्यायची असते. त्यानुसार मी त्यांची भेट घेतली आहे. आज सकाळी पंतप्रधानांशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली. त्यात मी त्यांचे आशीर्वादही घेतले. त्यावेळी महाराष्ट्रासंदर्भात आमची काही चर्चाही झाली आहे.

पंतप्रधानांनी मला सांगितलं आहे की महाराष्ट्र देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं राज्य आहे. या राज्याला गतीशील ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. त्यादृष्टीने पंतप्रधान महाराष्ट्राला पूर्ण सहकार्य द्यायला तयार आहेत", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले."मी काल पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, नितीन गडकरी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह अशा पक्षाच्या प्रमुख लोकांची सदिच्छा भेट घेतली आहे. रात्री जे. पी. नड्डा, अमित शाह आणि बी. एल. संतोष यांच्याशी मंत्रीमंडळाबाबत चर्चा केली", अशीही माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. दरम्यान, एकाच वेळी देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार दिल्लीत असताना एकनाथ शिंदे त्यांच्यासोबत का नाहीत? अशी चर्चा सुरू झाली आहे. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी यावेळी भूमिका स्पष्ट केली. "मंत्रीमंडळाच्या विस्ताराचा कोणताही तिढा नाहीये. अजित पवार त्यांच्या कामानिमित्त दिल्लीत आले आहेत. मी माझ्या कामानिमित्त आलो आहे. एकनाथ शिंदेंचं लगेच इथे काही काम नसल्यामुळे आलेले नाहीत. त्यामुळे ते मुंबईत आहेत, आम्ही दिल्लीत आहोत अशा चर्चांमध्ये अर्थ नाही. कालपासून माझी आणि अजित पवारांची दिल्लीत भेट झालेली नाही. मी माझ्या पक्षाच्या नेत्यांना भेटायला आलो आहे", असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.मा. राष्ट्रपती जी, मा. उपराष्ट्रपती जी, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि पक्षातील प्रमुख नेत्यांची सदिच्छा भेट घेत महाराष्ट्राच्या विकासयात्रेसाठी आशीर्वाद प्राप्त केले.

"आमच्या पक्षाचे मंत्री कोण असतील याचा निर्णय आमचं संसदीय मंडळ, नेते घेतात. काल चंद्रशेखर बावनकुळे आणि मी आमच्या नेत्यांची भेट घेतली. मंत्रीपदांबाबत चर्चाही केली आहे. प्रत्येक विभागातून कोण मंत्रीपदाचे उमेदवार असू शकतात, कुणाला आपण बनवू शकतो अशी एक यादी आम्ही तयार केली आहे. आता वरीष्ठ स्तरावर ते निर्णय घेतील आणि आम्हाला कळवतील.

मंत्रीपद वाटपाचा फॉर्म्युला ठरलाय. तुम्हाला लवकरच कळेल", असं सूचक विधान फडणवीसांनी केलं आहे.दरम्यान, उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना एकनाथ शिंदे यांच्याकडून गृहखात्याचा आग्रह धरण्यात आल्याचं बोललं जात आहे. अजूनही शिंदे गट गृहखात्यासाठी आग्रही असल्याची भूमिका मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर गृहखातं नेमकं कुणाकडे जाणार? याविषयी मोठी उत्सुकता निर्माण झालेली असताना देवेंद्र फडणवीसांनी मात्र यावर बोलणं टाळलं आहे. पत्रकारांनी याबाबत विचारणा केली असता "अरे बाबा थोडी वाट पाहा ना, एवढी घाई काय आहे. सगळं सांगतो", असं ते म्हणाले.देवेंद्र फडणवीसांनी राजधानी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला.

यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाच्या प्रमुख नेत्यांशी झालेल्या भेटीचा तपशील सांगितला. "एक पद्धत आहे की जेव्हा आपण मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतो, त्यानंतर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती यांची भेट घ्यायची असते.

### नव्या मंत्र्यांचा 14 डिसेंबरला शपथविधी

येत्या 14 डिसेंबरला महायुती सरकारच्या पहिल्या टप्प्यातील मंत्र्यांचा मंत्रिमंडळ विस्तार होऊन त्यांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडणार असल्याची दाट शक्यता आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वत: याबाबत माहिती दिली आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं आणि अर्थ खातं राहणार आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मंत्रिमंडळासाठी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची दाट शक्यता आहे. यामध्ये आमदार भरत गोगावले, आमदार संजय शिरसाट, आमदार आशिष जैस्वाल यांना नव्याने संधी मिळणार आहे. तर माजी मंत्री दीपक केसरकर, अब्दुल सत्तार यांचा डच्चू मिळण्याची दाट शक्यता आहे.

---

# ईव्हे ट्रान्सविरोधात एफआयआर नाही

## संजय मोरेला इलेक्ट्रिक बस चालवण्याचा कोणताही अनुभव नव्हता

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कुर्ला बेस्ट बस अपघातात ७ जणांनी जीव गमावला. या अपघातात ४८ जण जखमी झाले. सोमवारी रात्री साडे नऊच्या सुमारास हा अपघात झाला. त्यानंतर आसपासच्या लोकांनी बसचा चालक संजय मोरेला चोप दिला. संजय मोरे सध्या पोलिसांच्या कोठडीत आहे. त्याची चौकशी सुरु आहे. या चौकशीतून अनेक धक्कादायक बाबींचा उलगडा झाला आहे.**

संजय मोरेला इलेक्ट्रिक बस चालवण्याचा कोणताही अनुभव नव्हता. त्यानं मोठी बस चालवलेली नव्हती. पण अवघ्या तीन दिवसांच्या प्रशिक्षणानंतर त्याच्या हाती मोठी इलेक्ट्रिक बस देण्यात आली. मोरे १ डिसेंबरपासून कंत्राटी चालक म्हणून बेस्टमध्ये रुजू झाला होता. अपुरं प्रशिक्षण देण्यात आल्यानं बसचा अपघात झाल्याचं चौकशीतून समोर आलेलं आहे. बेस्ट प्रशासनानं ईव्हे ट्रान्स कंपनीला कंत्राट दिलेलं आहे. या कंपनीनं सोमवारी (ज्या दिवशी अपघात झाला) मोरेला इलेक्ट्रिक बसच्या तीन फेऱ्या पूर्ण करण्यास सांगितलं होतं. मोरे दुपारी अडीचच्या सुमारास कामावर आला होता. रात्री तो ३३२



क्रमांकाची बस घेऊन निघाला. ही बस कुर्ला रेल्वे स्थानक पश्चिमेहून आगरकर चौकाकडे जाण्यास निघाली होती.

मोरेनं बस सुरु करताच पुढील काही मिनिटांतच अपघात झाला. अनियंत्रित झालेल्या बसनं ३० ते ४० वाहनांना धडक दिली. पोलिसांनी अपघात प्रकरणी संजय मोरेला अटक केली आहे. तो २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडीत असेल. पण धक्कादायक बाब म्हणजे पोलिसांनी ईव्हे ट्रान्स कंपनीविरोधात एफआयआर दाखल केलेला नाही. फ्री प्रेस जर्नलनं याबद्दलचं वृत्त दिलेलं आहे. अननुभवी व्यक्तीच्या हाती बस देऊन प्रवाशांचा जीव धोक्यात घातल्याचा गुन्हा कंपनीकडून घडलेला आहे. पण तरीही कंपनीविरोधात अद्याप एफआयआरदेखील झालेला नाही.

### या अपघातात 48 जण जखमी झाले

त्यामुळे पोलीस नेमकं कोणाला वाचवत आहेत, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आम्ही आरटीओच्या अहवालाची प्रतीक्षा करत आहोत. अपघात झालेल्या बसमध्ये काही बिघाड होता का, याची माहिती आरटीओच्या अहवालातून मिळेल. मग या प्रकरणी पुढील कार्यवाही केली जाईल, असं पोलिसांकडून सांगण्यात आलेलं आहे. कंत्राटी चालक पूर्णत: प्रशिक्षित आहेत का, याची खातरजमा करण्याची जबाबदारी बेस्ट प्रशासनाची असते. पण ही खातरजमा करण्यात बेस्ट प्रशासनाकडून झालेली नव्हती.कुर्ला बेस्ट बस अपघातात ७ जणांनी जीव गमावला. या अपघातात ४८ जण जखमी झाले. सोमवारी रात्री साडे नऊच्या सुमारास हा अपघात झाला.

# आता दिल्ली विधानसभेची धूम!

## काँग्रेसने जाहीर केली यादी, केजरीवालांसमोर तगडा उमेदवार!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका झाल्या असून सरकारही स्थापन झालं आहे. महाराष्ट्राची ही निवडणूक देशभर चर्चेचा विषय राहिली. महायुतीला मिळालेला एकहाती विजय अवघ्या देशासाठी अचंबित करणारी गोष्ट होती. आता महाराष्ट्रानंतर दिल्लीत विधानसभेच्या निवडणुका होणार आहे. दिल्लीत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला नसला तरीही विविध पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दरम्यान, काँग्रेसने आज २१ उमेदवारांची यादीही जाहीर केली. दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा मुलगा संदीप दीक्षित हे अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात उभे ठाकले आहेत.**



AICC PRESS RELEASE
ASSEMBLY ELECTIONS - 2025
NCT OF DELHI

For favour of Publication.

(K.C. VENUGOPAL)
General Secretary AICC
12th December, 2024



### केजरीवालांना दुखावण्याचे टाळले

माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी एक्सवर एक पोस्ट करत सांगितले की, "आम आदमी पक्ष दिल्लीत स्वतःच्या ताकदीवर विधानसभा निवडणूक लढवणार आहे.आम्हाला लोकसभा निवडणुकीत त्याची किंमत मोजावी लागली आहे."दरम्यान राहुल गांधी यांची दिल्ली काँग्रेसच्या नेत्यांची बैठकीतील अनुपस्थिती केंद्रीय नेतृत्व आणि दिल्ली काँग्रेस यांच्यात दिल्ली विधानसभा आणि आपबरोबरच्या युतीच्या मुद्द्याबाबत असलेला दुरावा अधोरेखित करते. ७ डिसेंबरला समारोप झालेल्या दिल्ली न्याय यात्रेत काँग्रेसचा कोणताही महत्त्वाचा नेता सहभागी झाला नव्हता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीतील आप सरकारला लक्ष्य करण्यासाठी आखलेल्या या कार्यक्रमात सहभागी होऊन केजरीवालांना विरोध करण्याचा धोका काँग्रेच्या केंद्रीय नेतृत्त्वाला पत्करायचा नव्हता.

दिल्ली प्रदेशाध्यक्ष देवेंद्र यादव, जय किशन आणि हारून युसूफ, अनिल कुमार यांचीही या यादीत नावे आहेत. पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या (CEC) गुरुवारी झालेल्या बैठकीनंतर काँग्रेसने विधानसभेसाठी २१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. "या अशा जागा आहेत जिथे पक्षाला केवळ जिंकण्याची संधी आहे असा विश्वास वाटत नाही तर या उमेदवारांशिवाय पर्याय नव्हता अशा जागाही निवडल्या गेल्या", असे एका वरिष्ठ काँग्रेस नेत्याने सांगितले.राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. या भेटीत झालेल्या चर्चेनुसार, काँग्रेस आणि आपने स्वतंत्र निवडणूक लढण्याचे जाहीर केले. हरियाणा निवडणुकीतही या दोन्ही पक्षांनी स्वतंत्र लढत दिली होती.माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मंगळवारी एक्सवर एक पोस्ट करत सांगितले की, "आम आदमी पक्ष दिल्लीत स्वतःच्या ताकदीवर विधानसभा निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे काँग्रेसबरोबर युती होण्याची कोणतीही शक्यता नाही." दुसरीकडे दिल्लीचे काँग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी वार्ताहरांना सांगितले की, "आम्ही विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे लढवणार आहोत. आम्ही भ्रष्टाचारी केजरीवाल यांच्या पक्षाशी कोणतीही युती करणार नाही. त्यांच्याशी युती केल्याने आम्हाला लोकसभा निवडणुकीत त्याची किंमत मोजावी लागली आहे."दरम्यान राहुल गांधी यांची दिल्ली काँग्रेसच्या नेत्यांची बैठकीतील अनुपस्थिती केंद्रीय नेतृत्त्व आणि दिल्ली काँग्रेस यांच्यात दिल्ली विधानसभा आणि आपबरोबरच्या युतीच्या मुद्द्याबाबत असलेला दुरावा अधोरेखित करते. ७ डिसेंबरला समारोप झालेल्या दिल्ली न्याय यात्रेत काँग्रेसचा कोणताही महत्त्वाचा नेता सहभागी झाला नव्हता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीतील आप सरकारला लक्ष्य करण्यासाठी आखलेल्या या कार्यक्रमात सहभागी होऊन केजरीवालांना विरोध करण्याचा धोका काँग्रेच्या केंद्रीय नेतृत्त्वाला पत्करायचा नव्हता. याबाबत काँग्रेस कमिटीतील सूत्राने सांगितले की, "भारत न्याय यात्रेत रोजच आम आदमी पक्षाला लक्ष्य केले जात होते. अशा परिस्थितीत महत्त्वाच्या नेत्यांच्या उपस्थितीमुळे चुकीचा संदेश गेला असता आणि युती होण्यात अडचणी निर्माण झाल्या असत्या."दिल्ली प्रदेशाध्यक्ष देवेंद्र यादव, जय किशन आणि हारून युसूफ, अनिल कुमार यांचीही या यादीत नावे आहेत. पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या (CEC) गुरुवारी झालेल्या बैठकीनंतर

काँग्रेसने विधानसभेसाठी २१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. "या अशा जागा आहेत जिथे पक्षाला केवळ जिंकण्याची संधी आहे असा विश्वास वाटत नाही तर या उमेदवारांशिवाय पर्याय नव्हता अशा जागाही निवडल्या गेल्या", असे एका वरिष्ठ काँग्रेस नेत्याने सांगितले.राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. या भेटीत झालेल्या चर्चेनुसार, काँग्रेस आणि आपने स्वतंत्र निवडणूक लढण्याचे जाहीर केले. हरियाणा निवडणुकीतही या दोन्ही पक्षांनी स्वतंत्र लढत दिली होती.

# 'मी तेव्हा माझे तोंड लपवतो'

## नितीन गडकरींनी लोकसभेत बोलताना व्यक्त केली खंत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भाजपाचे नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे आपल्या रोखठोक विधानांसाठी ओळखले जातात. विकासाच्या प्रश्नावर बोलत असताना ते प्रसंगी प्रशासन आणि सरकारवरही बरसतात. नुकतेच त्यांनी रस्ते अपघातात होणाऱ्या मृत्यूबाबत लोकसभेत भूमिका मांडली. रस्ते अपघातात दररोज भारतात कुठे ना कुठे मृत्यू होत असतात.**

नुकतेच मुंबईच्या कुर्ला येथे बेस्ट बसच्या अपघातात सात जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तर गुरुवारी सीएसएमटी परिसरात बेस्ट बसखाली येऊन एका पादचाऱ्याचा मृत्यू झाला. तर खासगी वाहन आणि ट्रकची धडक लागून अनेकांचा मृत्यू होत असतो. याबाबत लोकसभेत बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, मी जेव्हा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होतो आणि रस्ते अपघाताचा विषय आला की, माझ्यावर तोंड लपविण्याची वेळ येते.भारतात रस्ते अपघातात मोठी वाढ झाली असून यात बदल घडविण्यासाठी मानवी स्वभावात बदल होणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली. तसेच त्यांनी जेव्हा पहिल्यांदा या खात्याचा पदभार स्वीकारला होता. तेव्हा रस्ते अपघातात ५० टक्के घट करण्याचे ध्येय ठेवले होते. पण अपघात कमी होणे दूरच राहिले, तर त्यात उत्तरोत्तर वाढ होत गेली, अशी कबुलीच गडकरी यांनी दिली. त्यामुळेच मी जेव्हा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होतो, तेव्हा रस्ते अपघाताचा विषय निघाल्यानंतर मला तोंड लपवावे लागते, असे ते म्हणाले.गुरुवारी लोकसभेत शून्य प्रहरात पुरवणी प्रश्नांना उत्तर देत असताना नितीन गडकरी यांनी रस्ते अपघातांवर भाष्य केले. ते म्हणाले, अपघात कमी करण्यासाठी मानवी स्वभावात बदल करावा लागेल. समाजालाही बदलावे लागेल. तसेच कायद्याचा सर्वांना सन्मान करावा लागेल. भारतात दरवर्षी रस्ते अपघातात १.७८ लाख बळी पडतात. त्यात ६० टक्के पीडित हे १८ ते ३४ वयोगटातील आहेत, अशीही माहिती गडकरी यांनी दिली.



### कोणत्या राज्यात सर्वाधिक मृत्यू?

उत्तर प्रदेशमध्ये रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू होत आहेत. एकूण अपघातांपैकी १३.७ टक्के म्हणजे २३,००० मृत्यू एकट्या उत्तर प्रदेशमध्ये झाले. त्यानंतर तमिळनाडूमध्ये १०.६ टक्के म्हणजे १८,००० मृत्यू झाले. तर तिसऱ्या स्थानावर महाराष्ट्र असून ९ टक्के म्हणजेच १५,००० मृत्यू झाल्याचे गडकरी यांनी सांगितले. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर मध्य प्रदेशमध्ये १३,००० मृत्यू झाले आहेत. नुकतेच मुंबईच्या कुर्ला येथे बेस्ट बसच्या अपघातात सात जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

# ऐश्वर्याच्या समर्थनार्थ काय म्हणाले रजनीकांत?

माझे वडिल संघी असते तर, त्यांनी लाल सलाम सारखा सिनेमा केला नसता, असे वक्तव्य सुपरस्टार रजीनीकांत यांची मुलगी ऐश्वर्या हिने काही दिवसांपूर्वी केले होते. दरम्यान, आता रजनीकांत यांनी मुलीच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. रजनीकांत मुलीच्या समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत. माझ्या मुलीने 'संघी' हा शब्द वाईट अर्थाने वापरला नाही, असे स्पष्टीकरण रजनीकांत यांनी दिले आहे. दाक्षिणात्य अभिनेता आणि सुपरस्टार रजनीकांत सध्या लाल सलाम या सिनेमामुळे चर्चेत आहेत. नुकताच लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लॉंच इव्हेंट पार पडला. यावेळी रजनीकांतची मुलगी आणि सिनेमाची दिग्दर्शक ऐश्वर्या देखील उपस्थित होती. यावेळी ऐश्वर्याने मनोगत व्यक्त केले होते. "माझे वडिल संघी नाहीत", असे ऐश्वर्या म्हणाली होती. दरम्यान, यानंतर ऐश्वर्या आणि रजनीकांत यांना सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. त्यानंतर रजनीकांत यांनी संघी या शब्दाबाबत मौन सोडले आहे. ऐश्वर्याला संघी हा शब्द वाईट अर्थाने वापरायचा नव्हता, असे रजनीकांत म्हणाले आहेत. लाल सलाम या सिनेमाचा ऑडिओ लॉंच इव्हेंट काही दिवसांपूर्वी पार पडला. यावेळी ऐश्वर्याने वडील रजनीकांत यांच्यावर होणाऱ्या व्यक्तीगत टीकेला प्रत्युत्तर दिले होते. ऐश्वर्या म्हणाली होती की, सोशल मीडियावर माझ्या वडिलांना संघी म्हटले जात आहे.

# सैफच्या मुलासाठी करणने केली चित्रपटाची घोषणा

करण जोहरने सोशल मीडियावर एक पोस्ट केली. त्यावर कमेंट सेक्शनमध्ये लोकांनी उत्तर देत त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. करणने बहुतेक प्रथमच अशा रीतीने एखाद्या चित्रपटाची घोषणा केली असल्याचं दिसत आहे. करणच्या या पोस्टची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. या पोस्टमध्ये करणने चित्रपटासंबंधी तीन प्रश्न विचारले आहेत. या तीन प्रश्नांमधून करणने चांगलाच सस्पेन्स निर्माण केला आहे. नेमकं करण पोस्टमध्ये लिहितो, “ही कोणत्याही चित्रपटाची घोषणा नाही, किंवा असूही शकते जर तुम्ही मदत केलीत तर. गेल्यावर्षापासून आम्ही एका चित्रपटावर काम करत आहोत आणि याबद्दल चांगलीच गुप्तता पाळण्यात आली होती. चित्रपटाच्या दिग्दर्शकाचीच तशी मागणी होती. तर या काही हिंट आहेत ज्यावरून आम्ही नेमक्या कोणत्या चित्रपटाबद्दल बोलत आहोत ते तुम्हाला ओळखायचं आहे. पहिली हिंट म्हणजे यात एक अत्यंत लोकप्रिय अशी अभिनेत्री आहे, दुसरी हिंट म्हणजे यात दक्षिणेतील एक मोठा सुपरस्टार आहे ज्याने नुकताच एक जबरदस्त पॅन-इंडिया सुपरहीट चित्रपट दिला आहे. तिसरी हिंट अशी की यात एक लेगसी डेब्यू अभिनेता आहे जो या इंडस्ट्रीमध्ये स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी फार उत्सुक आहे व प्रचंड मेहनत घेत आहे.”पुढे करण लिहितो, “हा चित्रपट जवळपास तयारच आहे लवकरच आम्ही तो प्रदर्शित करणार आहोत? तुमच्या मते हा चित्रपट कोणता आहे?

# प्राजक्ता माळीचं सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी (PRAJAKTTA MALI) ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॉबी देओलस आणि डॉनस... यात माझा 2024चा शेवटचा सेल्फी आणि 2025चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु AII ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# ‘गजनी’ फेम असिनचं लग्न

‘गजनी’ फेम अभिनेत्री असिनने मायक्रोमॅक्सचा संस्थापक राहुल शर्माशी लग्न केलं आहे. पण या दोघांचे लग्न एका बॉलीवूड अभिनेत्यामुळे झाले. राहुल हा प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्याचा मित्र आहे. त्याच अभिनेत्याबरोबर असिन एका चित्रपटात काम करत होती. त्या अभिनेत्याने ठरवून असिन व राहुल यांची भेट घडवून आणली, पुढे या दोघांनी लग्न केलं. आता एका नवीन मुलाखतीत राहुल शर्माने याबाबत सांगितलं आहे. राहुल व असिनची भेट अक्षय कुमारने घडवून आणली.“आम्ही भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यासाठी जात होतो. अक्षयचा हाऊसफुल २ हा चित्रपट येणार होता आणि त्या चित्रपटात ती काम करत होती. आणि मग अक्षय म्हणाला, ‘एक चित्रपट येतोय. आम्हाला चित्रपटाचे प्रमोशन करायचे आहे.’ मायक्रोमॅक्स बांगलादेशातील ढाका येथे झालेल्या एशिया कपचे स्पॉन्सर होते. जर कोणी मला विचारलं की तू तुझ्या पत्नीला कुठे भेटलास, तर मी म्हणेन पृथ्वीवरील सर्वात रोमँटिक ठिकाण, ढाकामध्ये”असं राहुल हसत राज शामानीच्या पॉडकास्टमध्ये म्हणाला.पहिल्या भेटीत राहुल व असिन एकमेकांशी जास्त बोलले नव्हते. “अक्षय मला म्हणाला की ती खूप साधी मुलगी आहे. ती अगदी तुझ्यासारखीच आहे. ती येते, तिचे काम करते आणि परत जाते. खूप प्रोफेशनल आहे. तिची आई डॉक्टर आहे, वडील नोकरी करतात. मग त्याने तिचा नंबर मला आणि माझा नंबर तिला दिला. आमच्यात खूप साम्य आहे असं त्याला वाटलं. आम्ही सारख्याच कौटुंबिक पार्श्वभूमीतून आलो आहोत,” असं राहुल शर्मा म्हणाला.अक्षयने असिनशी करून दिलेली ओळख आणि भेट हे त्याचं आपल्या आयुष्यातील सर्वात मोठं योगदान असल्याचं राहुल म्हणतो. राहुल शर्माशी लग्न केल्यावर असिनने अभिनय सोडला. असिन शेवटची २०१५ मध्ये रोमँटिक कॉमेडी ‘ऑल इज वेल’ चित्रपटात झळकली होती.२०१६ मध्ये, अक्षयने स्वतः असिन आणि राहुल यांचं लग्न जमवल्याचं म्हटलं होतं. “मी हे साडेतीन ते चार वर्षांपासून लपवून ठवतोय. पण होय, मीच त्यांना भेटायला लावलं. जॅकलीन फर्नांडीजचा यात सहभाग होता, पण तिलादेखील माहीत नव्हतं, कारण मी खूप हुशारीने या सगळ्या गोष्टी केल्या,” असं अक्षय म्हणाला होता. अक्षयने सांगितलेलं की ‘हाऊसफुल 2’ च्या शूटिंगदरम्यान टीम दिल्लीत होती. तिथे सगळे लपंडाव खेळत होते. राहुल शर्मादेखील तिथे आला होता.

# मयुरी देशमुखचा 'लग्नकल्लोळ'



मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे.मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्माते आहेत. तर मोहम्मद एस. बर्मावाला आणि डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे दिग्दर्शित 'लग्न कल्लोळ' या चित्रपटाचे लेखन जितेंद्रकुमार परमार यांनी केले आहे.चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. लग्न म्हटले की घरात कल्लोळ हा आलाच. परंतु हा कल्लोळ जरा वेगळा आहे. यात ट्विस्ट आहे. हा कौटुंबिक चित्रपट असून प्रेक्षकांसाठी निखळ मनोरंजनाचा खजिना आहे.”मयुरी देशमुख, सिद्धार्थ जाधव आणि भूषण प्रधानयांची प्रमुख भूमिका असलेल्या ‘लग्नकल्लोळ’ या चित्रपटाचा जबरदस्त टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून प्रेक्षक या धमाकेदार चित्रपटाची आतुरतेने वाट पाहाणार, हे नक्की! या चित्रपटाच्या टिझरला प्रेक्षकांनी चांगलीच पसंती दिलीय. त्यामुळे लग्नकल्लोळ सुपरहिट होणार यात शंका नाही.टिझरमध्ये सिद्धार्थ सोबत मयुरी लग्नमंडपात दिसत आहे तर दुसऱ्या क्षणी भूषण मयुरीला लग्नाची मागणी घालताना दिसत आहे. यावरून मयुरी नक्की कोणासोबत लग्न करणार आणि हा काय ‘लग्नकल्लोळ’ सुरू आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहिल्यावरच मिळणार आहे. चित्रपटात या प्रमुख कलाकारांसोबत अनेक दमदार कलाकार आहेत. हा लग्नाचा धमाका १ मार्चला उडणार आहे. मयुर तिरमखे फिल्म्स निर्मित या चित्रपटाचे, आण्णासाहेब रामचंद्र तिरमखे, मंगल आण्णासाहेब तिरमखे, डॉ. मयुर आण्णासाहेब तिरमखे निर्मित आहेत. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक, मोहम्मद बर्मावाला म्हणतात, " चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.

# रोहित शर्मा यशस्वीवर वैतागला!

## जैस्वालला हॉटेलमध्येच सोडून गेली टीम बस!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरा कसोटी सामना १४ डिसेंबरपासून गाबाच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. तत्पूर्वी भारतीय संघाच्या खेम्यातून एक बातमी समोर येत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रोहित शर्मा यशस्वी जैस्वालवर नाराज असल्याचं म्हटलं जात आहे. यशस्वी जैस्वालला त्याच्या चुकीमुळे टीम हॉटेलमध्येच सोडण्यात आले. वृत्तानुसार, यशस्वी जैस्वाल टीम बसमध्ये चढण्यासाठी वेळेवर पोहोचला नाही आणि त्यामुळे खेळाडूला तिथेच सोडण्यात आले. यशस्वी बसपाशी पोहोचलो तेव्हा टीम बस निघून गेली होती.**



यशस्वी जैस्वाल उशिरा पोहोचल्याने रोहित शर्मा चांगलाच संतापला होता. भारतीय संघ बुधवारी सकाळी ॲडलेडहून ब्रिस्बेनसाठी रवाना होणार होता. विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह हे दोन खेळाडू त्यांच्या कुटुंबासह चार्टर्ड फ्लाईटने ब्रिस्बेनला जाणार होते. याशिवाय भारतीय संघ, सपोर्ट स्टाफ आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर हे सकाळी ८.३० च्या आधी लॉबीमध्ये जमले होते. पण यशस्वी जैस्वाल मात्र तिथे उपस्थित नव्हता.

यशस्वी हा इतरवेळेस कायम वेळेत पोहचतो, पण यावेळेस मात्र तो संपूर्ण संघासह लॉबी एरियामध्ये वेळेत पोहोचला नाही. यशस्वी जैस्वाल उशिरा का पोहोचला याचं कारण तरी अद्याप समोर आलेलं नाही. पण कर्णधाराने मात्र त्याच्या शिस्तभंगाची कारवाई केली आहे. रोहित काही वेळाने टीम बसमधून बारे आला आणि त्याने संघाच्या मॅनेजरला यशस्वी जैस्वाल कुठे आहे, हे पाहण्यास सांगितले. यानंतर मॅनेजर आणि संघाचे सिक्युरिटी ऑफिसरही बसबाहेर गेले आणि मोठ्या चर्चेनंतर अखेरीस यशस्वी जैस्वालशिवाय टीम बस सोडण्यात आली, असे रिपोर्टमध्ये म्हटले आहे.टीम बस गेल्यानंतर २० मिनिटांनी यशस्वी जैस्वाल लॉबीमध्ये आला. यशस्वीसाठी संघाने कारची व्यवस्था केली होती. यानंतर यशस्वीबरोबर संघाचे वरिष्ठ सिक्युरिटी ऑफिसर कारने विमानतळावर पोहोचले. ऑस्ट्रेलियातून आलेल्या वृत्तानुसार, टीम इंडियाची ब्रिस्बेनला जाणारी फ्लाइट सकाळी १०.०५ वाजता होती. सकाळी ८.२० वाजता संघाचे खेळाडू संघ बसमध्ये चढू लागले. ८.३० पर्यंत टीम बस विमानतळासाठी निघणार होती मात्र जैस्वाल वेळेवर पोहोचला नाही. गाबा कसोटीत आता सर्वांच्या नजरा रोहित शर्मा विराट कोहलीसारख्या भारताच्या वरिष्ठ खेळाडूंवर असणार आहे. भारताला मालिकेत कायम ठेवण्यासाठी रोहित-विराटकडून चांगल्या कामगिरीची सर्वांना अपेक्षा आहे. विराट कोहलीने पहिल्या कसोटीत शतक झळकावले होते, पण इतर तिन्ही डावांमध्ये तो फेल ठरला. यानंतर रोहित शर्मा सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरला पण तिथे तो चांगली खेळी करू शकला नाही.यशस्वी जैस्वाल उशिरा पोहोचल्याने रोहित शर्मा चांगलाच संतापला होता. भारतीय संघ बुधवारी सकाळी ॲडलेडहून ब्रिस्बेनसाठी रवाना होणार होता. विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह हे दोन खेळाडू त्यांच्या कुटुंबासह चार्टर्ड फ्लाईटने ब्रिस्बेनला जाणार होते. याशिवाय भारतीय संघ, सपोर्ट स्टाफ आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर हे सकाळी ८.३० च्या आधी लॉबीमध्ये जमले होते. पण यशस्वी जैस्वाल मात्र तिथे उपस्थित नव्हता.यशस्वी हा इतरवेळेस कायम वेळेत पोहचतो, पण यावेळेस मात्र तो संपूर्ण संघासह लॉबी एरियामध्ये वेळेत पोहोचला नाही.

### जैस्वालशिवाय बस सोडण्यात आली

यशस्वी जैस्वाल उशिरा का पोहोचला याचं कारण तरी अद्याप समोर आलेलं नाही. पण कर्णधाराने मात्र त्याच्या शिस्तभंगाची कारवाई केली आहे. रोहित काही वेळाने टीम बसमधून बारे आला आणि त्याने संघाच्या मॅनेजरला यशस्वी जैस्वाल कुठे आहे, हे पाहण्यास सांगितले. यानंतर मॅनेजर आणि संघाचे सिक्युरिटी ऑफिसरही बसबाहेर गेले आणि मोठ्या चर्चेनंतर अखेरीस यशस्वी जैस्वालशिवाय टीम बस सोडण्यात आली, असे रिपोर्टमध्ये म्हटले आहे.टीम बस गेल्यानंतर २० मिनिटांनी यशस्वी जैस्वाल लॉबीमध्ये आला. यशस्वीसाठी संघाने कारची व्यवस्था केली होती. यानंतर यशस्वीबरोबर संघाचे वरिष्ठ सिक्युरिटी ऑफिसर कारने विमानतळावर पोहोचले. ऑस्ट्रेलियातून आलेल्या वृत्तानुसार, टीम इंडियाची ब्रिस्बेनला जाणारी फ्लाइट सकाळी १०.०५ वाजता होती. सकाळी ८.२० वाजता संघाचे खेळाडू संघ बसमध्ये चढू लागले.

# नितीश राणा युवा खेळाडूवर संतापला

## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या सामन्यात भिडले भारताचे दोन खेळाडू

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय देशांतर्गत स्पर्धेतील सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमधील उपांत्यपूर्व फेरीचे सामने संपले आहेत. या स्पर्धेचा शेवटचा उपांत्यपूर्व सामना दिल्ली आणि उत्तर प्रदेश संघांमध्ये बेंगळुरू येथे खेळला गेला. दिल्ली संघाने हा सामना जिंकून उपांत्य फेरीतील आपले स्थान पक्के केले. मात्र या सामन्यादरम्यान दोन खेळाडू एकमेकांशी भिडले.**



नितीश राणा आणि युवा खेळाडू आयुष बदोनीमध्ये जोरदार वादावादी झाली. यानंतर पंचांनी प्रकरण शांत केले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीतील दिल्लीच्या डावादरम्यान ही घटना घडली. दिल्लीच्या डावात उत्तर प्रदेशचा खेळाडू नितीश राणा गोलंदाजी करत होता.तर दिल्लीचा कर्णधार आयुष बडोनी क्रीजवर होता. त्याने नितीशच्या षटकात त्याने एक फटका खेळत धाव घेऊन नॉन स्ट्राइकवर पोहोचला. आयुष धाव घेऊन येत असताना नितीश राणा मध्ये आल्याने दोन्ही खेळाडूंमध्ये बाचाबाची झाली. व्हायरल व्हिडिओमध्ये दिसत आहे की, नितीश राणा त्याला काहीतरी बोलला आणि त्यानंतर बडोनीही प्रत्युत्तर देण्यासाठी सरसावला. यानंतर परिस्थिती बिघडत असल्याचे पाहून पंचांनी हस्तक्षेप करून प्रकरण शांत केले.आयुष बडोनी आणि नितीश राणा जुने मित्र आहेत. नितीश राणा याआधी दिल्ली संघाकडून खेळायचा आणि कर्णधारही होता. पण २०२३ मध्ये त्याने यूपीकडून खेळण्याचा निर्णय घेतला होता.

### धुलने 42 धावांचे योगदान दिले

आयपीएल २०२३ मध्ये नितीश राणाचा मुंबई इंडियन्सच्या हृतिक शौकीनबरोबरी वाद झाला होता. हृतिकदेखील दिल्ली संघाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो.दिल्ली आणि उत्तरप्रदेश या दोन्ही संघांमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात उत्तर प्रदेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ९ गडी गमावून १९३ धावा केल्या. यादरम्यान अनुज रावतने ३३ चेंडूत ७३ धावांची नाबाद खेळी केली. ज्यामध्ये ७ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता.